आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३१ डिसेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- इसरोच्या स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत अंतराळात जोडल्या जाणाऱ्या २ उपग्रहांचं यशस्वी प्रक्षेपण

- 2024 हे वर्ष अंतराळ विज्ञान क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्य मंत्र्यांचं प्रतिपादन

- प्राप्तीकरासंदर्भातल्या 'विवाद से विश्वास योजनेला' येत्या ३१ जानेवारी पर्यंत मुदतवाढ

- नववर्ष स्वागताचा सर्वत्र उत्साह, प्रशासनही सज्ज

  **आणि**

- मस्साजोग सरपंच हत्याप्रकरणी फरार वाल्मिक कराड पोलिसांना शरण

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्त्रोनं आपल्या स्पेडेक्स मोहीमेअंतर्गत काल श्रीहरीकोटा इथल्या उपग्रह प्रक्षेपक तळावरुन दोन उपग्रह अवकाशात सोडले. या मोहिमेअंतर्गत अंतराळात दोन उपग्रहांची जोडणी अर्थात डॉकिंग करण्यात येणार आहे. दोन्ही उपग्रह पृथ्वीपासून काही अंतरावर आपापल्या कक्षांमध्ये स्थिरावले. येत्या काही दिवसात दोन्ही उपग्रहांमधलं अंतर कमी होईल आणि त्यानंतर डॉकिंगची प्रक्रिया सुरू

होईल, असं इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी सांगितलं. या मोहीमेच्या यशानंतर, अंतराळात दोन उपग्रह एकमेकांशी जोडणं अथवा विलग करण्याचं तंत्रज्ञान वापरणारा भारत जगातला ‘चौथा देश’ ठरेल.

या कामगिरीबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी इस्रोच्या चमूचं अभिनंदन केलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही इसरोच्या कामगिरीची प्रशंसा केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेला बळ देणारी ही कामगिरी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

2024 हे वर्ष अंतराळ विज्ञान क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्य मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी आज सांगितलं. ते नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित स्पेडेक्स ही इसरोची ९९ वी मोहीम होती आणि येत्या जानेवारीत १०० वी मोहीम होईल अशी माहिती त्यांनी दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृष्टीने खासगी गुंतवणुकीला दारं उघडल्यामुळे अंतराळ मोहिमांना वेग आला असून गेल्या १० वर्षात या क्षेत्राने ९ टक्के दराने वाढ नोंदवली आहे असं ते म्हणाले. खासगी क्षेत्राच्या सहभागाने देशाला अंतराळ विज्ञान क्षेत्रात मोठा टप्पा गाठणं शक्य झालं, असं त्यांनी सांगितलं.

ते म्हणाले की भारताचं अंतराळ स्थानक येत्या २०५०पर्यंत साकार होईल.

**बाईट - जितेंद्र सिंग....**

**<><><><><>**

भारतीय बँकांचा अनुत्पादक मालमत्ता दर्जा सुधारला असून निव्वळ बुडीत कर्जाचं प्रमाण २ पूर्णांक ६ दशांश टक्के इतकं कमी झालं आहे. गेल्या सप्टेंबरमध्ये नोंदवलं गेलेलं हे प्रमाण म्हणजे गेल्या बारा वर्षातला नीचांक आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या वित्तीय स्थिरता अहवालात ही माहिती देण्यात आली आहे.

**<><><><><>**

आरटीजीएस अथवा एनईएफटी या बँकिंग प्रणालीचा वापर करून ऑनलाईन पद्धतीनं बँक खात्यात पैसे जमा करणाऱ्यांना व्यवहार करण्यापूर्वी संबंधित प्राप्तकर्त्याच्या नावाची पडताळणी करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी असे निर्देश भारतीय रिझर्व्ह बँकेने दिले आहेत. इंटरनेट बँकिंग तसंच मोबाइल बँकिंग सुविधेचा वापर करताना ग्राहकांना प्राप्तकर्त्याचं नाव आणि खात्याचे तपशील यांची पडताळणी करता येईल. येत्या १ एप्रिलपासून ही सुविधा सुरु होणार असून त्यासाठी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि सर्व बँकांनी आवश्यक ती पावलं उचलावीत, असे निर्देश रिझर्व्ह बँकेनं दिले आहेत.

**<><><><><>**

प्राप्तीकरासंदर्भातले तंटे सोडवण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या विवाद से विश्वास या योजनेला केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं येत्या 31 जानेवारी पर्यंत मुदतवाढ दिली आहे. करदात्यांना ठराविक टक्केवारीसह विवादित रक्कम भरून करदायित्वाची पूर्ती करता यावी या दृष्टीनं ही योजना आखण्यात आली आहे.

<><><><><>

सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधनासोबतच सांस्कृतिक विभागाशी संबंधित सर्व बाबींमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असल्यानं चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी 'एक खिडकी पद्धतीने परवानगी' देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुंबईत काल झालेल्या बैठकीत सांस्कृतिक कार्य विभागाच्या येत्या शंभर दिवसांच्या नियोजनाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं त्रिशताब्दी वर्ष साजरं करण्यासाठी त्यांचं कार्य, सर्व शाळा आणि महाविद्यालयांपर्यंत पोहोचवावं यासाठी कार्यक्रमांचं आयोजन करून वर्षभराचा आराखडा तयार करण्याचे निर्देश देखील त्यांनी यावेळी दिले.

<><><><><>

आज 31 डिसेंबर- सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचं स्वागत करण्याचा दिवस. नव्या वर्षाचं स्वागत करण्यासाठी सर्वत्र उत्साह आणि

जल्लोष दिसत आहे. विविध पर्यटन स्थळं गर्दीने फुलून गेली आहेत. ठिकठिकाणी स्थानिक प्रशासनानंही यासाठी जय्यत तयारी केली आहे. मुंबईतल्या समुद्र किनाऱ्यांवर रात्रीच्या वेळी येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट विविध बसमार्गांवर रात्री 25 जादा बसगाड्या सोडणार आहे. तसंच बेस्टतर्फे आज ‘हेरिटेज टूर’ चालवण्यात येणार आहेत.

नवी मुंबईत अडीच हजार पोलीस अधिकारी-कर्मचारी, त्याशिवाय वाहतूक विभागाचे अधिकारी-कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहेत. शहराच्या प्रवेशद्वारावर, मुख्य चौकात तसंच फार्म हाऊस परिसरात पोलिसांची गस्त राहणार आहे. नागरिकांनी नवीन वर्षाचे स्वागत करताना इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घेऊन तसेच नियमांचे उल्लंघन न करता उत्साहाने आणि सुरक्षितपणे नूतन वर्षाचे स्वागत करावं असं आवाहन नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केलं आहे....

**बाईट - मिलिंद भारंबे**

नवीन वर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर, पुण्यात 3 हजार पोलीस-अधिकारी कर्मचारी आणि 700 वाहतूक पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. शहरात 23 ठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे.

बीड इथं आज सरत्या वर्षाला निरोप देताना व्यसनमुक्ती फेरी काढण्यात आली. शिवसंग्रामच्या अध्यक्ष ज्योती मेटे यावेळी उपस्थिती होत्या.

व्यसनमुक्ती विषयी जनजागृतीचे फलक घेऊन बाल वारकरी आणि विद्यार्थ्यांसह नागरिक या फेरीत सहभागी झाले होते.

**<><><><><>**

कोरेगांव भीमा इथं उद्या होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी पाच हजार पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे एक हजार जवान आणि ७५० पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. दरम्यान, विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना तिथल्या सुविधांची माहिती मिळावी यासाठी जिल्हा परिषदेनं ‘विजयस्तंभ सुविधा’ ॲप तयार केलं आहे. आज आणि उद्या कोरेगाव भिमा इथं बससेवा, आरोग्य सेवा, स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष, शौचालय सुविधा, निवारा कक्ष, पिण्याचं पाणी, पोलीस मदत कक्ष आदी विविध सुविधा प्रशासनानं उपलब्ध करुन दिल्या आहेत.

**<><><><><>**

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी नववर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.प्रगतीशील आणि सर्वसमावेशक अशा विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी  नववर्ष ही उत्तम संधी आहे. असं राज्यपालांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

तुळजापूरमधे  तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी नवरात्रोत्सवापूर्वीच्या मंचकी निद्रेला आज संध्याकाळी प्रारंभ होत आहे. सात ते चौदा जानेवारी दरम्यान तुळजाभवानी मातेचा शाकंभरी नवरात्र महोत्सव साजरा होणार आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर चर्चेत आलेले वाल्मिक कराड हे आज पुण्यातल्या सीआयडी कार्यालयात पोलिसांना शरण आले. शरण येण्यापूर्वी त्यांनी स्वतःचा एक व्हिडिओ प्रसिद्ध केला असून यात त्यांनी स्वत:वरचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आपल्यावर राजकीय द्वेषापोटी आरोप करण्यात आले असून चौकशीअंती आपण दोषी आढळलो तर शिक्षा भोगण्यास तयार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी शहरातून चार बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यात तीन महिलांचा समावेश आहे. भिवंडी पोलीस ठाण्यात त्यांच्या विरुद्ध तक्रार नोंदवण्यात आली असून त्यांचा तपास सुरु असल्याची माहिती  भिवंडी शहर पोलीस आयुक्तांनी दिली. सध्या भिवंडी

शहरात युद्धपातळीवर शोध मोहीम  सुरु असून गेल्या २५ दिवसात एकूण २३ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतलं आहे.

//<><><><><>//